दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com
संपादक : अजय भांगे
https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | बुधवार दि.४ नोव्हेंबर २०२६ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ४ थे | अंक ४७ | पाने ४ | किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi | Wednesday 4 November 2026 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 04 | Issue 47 | Pages 4 | Rate 4 Rs

सातार्‍यात भाजपचा,सांगलीत महाविकास आघाडीचे वर्चस्व

मुंबई–राज्यातील सहकार क्षेत्रातील अतिशय प्रतिष्ठेच्या मानल्या जाणाऱ्या सातारा, सांगली आणि अहिल्यानगर या तीन जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या निवडणुकीचा निकाल आज जाहीर झाला आहे. या तिन्ही जिल्ह्यांमध्ये काही जागा यापूर्वीच बिनविरोध निवडून आल्या होत्या. मात्र, उर्वरित जागांसाठी झालेल्या अटीतटीच्या लढतींचे निकाल आज स्पष्ट झाले असून, नव्या संचालकांच्या नावांवर शिक्कामोर्तब झाले आहे.या निवडणुकीत अनेक दिग्गजांची प्रतिष्ठा पणाला लागली होती. सातार्‍यात भाजप, राष्ट्रवादी आणि शिवसेनेने लक्षणीय जागा जिंकल्या आहेत, तर सांगलीमध्ये काँग्रेस आणि राष्ट्रवादी (शरद पवार) आघाडीने सत्तास्थापनेच्या दिशेने वाटचाल केली आहे. अहिल्यानगरमध्ये विखे-थोरात यांच्या सहकार विकास पॅनलने मोठे यश मिळवले आहे.

महाराष्ट्राच्या आरोग्य यंत्रणेला मिळणार मोठे बळ

१,४४० वैद्यकीय अधिकाऱ्यांना नियुक्ती आदेश, ६७४ विशेषज्ञ डॉक्टरांचा समावेश

दैनिक वादळ वार्ता
मुंबई (वृत्तसंस्था)

राज्यातील सार्वजनिक आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र शासनाने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. राज्यातील शासकीय रुग्णालयांमधील डॉक्टरांची कमतरता दूर करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाकडून १ हजार ४४० वैद्यकीय अधिकाऱ्यांना नियुक्ती आदेश देण्यात येणार आहेत. यामध्ये ६७४ विशेषज्ञ वैद्यकीय अधिकारी आणि ७६६ एमबीबीएस डॉक्टरांचा समावेश आहे. या नियुक्ती आदेशांचे वितरण करण्यासाठी उद्या, ४ नोव्हेंबर रोजी विशेष समारंभ आयोजित करण्यात आला आहे. या निर्णयामुळे राज्यातील ग्रामीण, दुर्गम आणि आदिवासी भागातील आरोग्यसेवेला मोठे बळ मिळण्याची अपेक्षा आहे.राज्यातील सर्वसामान्य नागरिकांना दर्जेदार आणि वेळेत वैद्यकीय उपचार मिळावेत, यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाने रिक्त पदे भरण्याच्या प्रक्रियेला प्राधान्य दिले आहे. विशेषतः ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये आणि जिल्हा रुग्णालयांमध्ये वैद्यकीय अधिकाऱ्यांची उपलब्धता वाढविणे आवश्यक होते. अनेक शासकीय आरोग्य संस्थांमध्ये डॉक्टरांची पदे रिक्त असल्याने सध्या कार्यरत असलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांवर कामाचा अतिरिक्त ताण येत आहे. तसेच अनेकदा रुग्णांना उपचारांसाठी मोठ्या शहरांतील रुग्णालयांमध्ये जावे लागत आहे. ही परिस्थिती बदलण्यासाठी १,४४० वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या महत्त्वपूर्ण ठरणार आहेत.महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ (एस-२०) संवर्गातील वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या एकूण २ हजार ५१४ पदांपैकी १ हजार ४४० पदांच्या भरतीसाठी २७ फेब्रुवारी २०२६ रोजी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. या भरती प्रक्रियेत ६७४ विशेषज्ञ वैद्यकीय अधिकारी आणि ७६६ एमबीबीएस वैद्यकीय अधिकारी अशा एकूण १ हजार ४४० पदांचा समावेश आहे. या सर्वांना नियुक्ती आदेश वितरित करण्यासाठी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.या भरतीतील विशेषज्ञ डॉक्टरांच्या नियुक्त्यांमुळे शासकीय रुग्णालयांमध्ये विविध वैद्यकीय शाखांमधील उपचार सुविधा अधिक सक्षम करता येणार आहेत. ग्रामीण रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये आणि जिल्हा रुग्णालयांमध्ये विशेषज्ञ डॉक्टर उपलब्ध झाल्यास रुग्णांना स्थानिक पातळीवरच आवश्यक उपचार मिळण्यास मदत होईल. दुसरीकडे, ७६६ एमबीबीएस डॉक्टरांच्या नियुक्त्यांमुळे प्राथमिक आरोग्य केंद्रांसह अन्य शासकीय आरोग्य संस्थांमधील नियमित रुग्णसेवा अधिक प्रभावी होण्याची अपेक्षा आहे.राज्यातील ग्रामीण, डोंगराळ, दुर्गम आणि आदिवासी भागांमध्ये आरोग्य सुविधांपर्यंत पोहोचणे आजही अनेक नागरिकांसाठी आव्हानात्मक आहे. काही भागांमध्ये डॉक्टरांची कमतरता असल्याने रुग्णांना साध्या आजारांच्या उपचारांसाठीही दूरच्या शहरांमध्ये जावे लागते. विशेषतः गर्भवती महिला, लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि गंभीर आजारांनी ग्रस्त असलेल्या रुग्णांना याचा अधिक त्रास सहन करावा लागतो.नव्या नियुक्त्यांमुळे अशा भागांतील आरोग्य संस्थांमध्ये डॉक्टरांची उपलब्धता वाढण्यास मदत होणार आहे. अपघात, प्रसूती, सर्पदंश, संसर्गजन्य आजार आणि इतर वैद्यकीय आपत्कालीन परिस्थितींमध्ये रुग्णांना वेळेत उपचार मिळण्याची शक्यता वाढेल. तसेच माता व बाल आरोग्य सेवा, नियमित आरोग्य तपासणी, आजारांचे निदान आणि उपचार यांसारख्या सेवांनाही गती मिळू शकते.वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरली गेल्यामुळे सध्या कार्यरत असलेल्या डॉक्टरांवरील अतिरिक्त कामाचा भार कमी होण्यास मदत होईल. रुग्णालयांमधील बाह्यरुग्ण विभाग (ओपीडी), आंतररुग्ण विभाग, आपत्कालीन सेवा आणि विविध वैद्यकीय तपासण्यांच्या प्रक्रियेत अधिक कार्यक्षमता निर्माण होऊ शकते. रुग्णालयांमध्ये पुरेसे डॉक्टर उपलब्ध झाल्यास रुग्णांना उपचारांसाठी दीर्घकाळ प्रतीक्षा करावी लागण्याचे प्रमाणही कमी होण्यास मदत होईल.विशेषज्ञ डॉक्टरांची नियुक्ती हा या भरती प्रक्रियेतील महत्त्वाचा भाग आहे. अनेकदा विशिष्ट आजारांवरील उपचारांसाठी रुग्णांना जिल्ह्याबाहेर किंवा मोठ्या शहरांमध्ये जावे लागते. मात्र, शासकीय रुग्णालयांमध्येच विशेषज्ञ डॉक्टर उपलब्ध झाल्यास रुग्णांचा प्रवासाचा वेळ आणि आर्थिक खर्च कमी होऊ शकतो. त्यामुळे सार्वजनिक आरोग्य यंत्रणेवरील नागरिकांचा विश्वास वाढविण्यासही मदत होईल.राज्यातील प्रत्येक नागरिकाला गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा उपलब्ध करून देणे, विशेषतः शेवटच्या घटकापर्यंत शासकीय आरोग्य सुविधा पोहोचविणे, हे सार्वजनिक आरोग्य विभागासमोरील महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. त्यासाठी डॉक्टरांची रिक्त पदे भरण्याबरोबरच शासकीय आरोग्य संस्थांमधील मनुष्यबळ उपलब्धता वाढविण्यावर भर दिला जात आहे.१ हजार ४४० वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या नियुक्त्यांमुळे राज्याच्या आरोग्य यंत्रणेला आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध होणार आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील आरोग्यसेवा अधिक सक्षम करणे, रुग्णांना वेळेत उपचार देणे आणि शासकीय रुग्णालयांमधील सेवा अधिक लोकाभिमुख बनविणे या प्रयत्नांना गती मिळण्याची अपेक्षा आहे.

डॉक्टरांनी सेवाभावाने काम करावे : प्रकाश आबिटकर

याबाबत सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी सांगितले की, राज्यातील गरीब, गरजू आणि ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार आरोग्यसेवा त्यांच्या जवळच उपलब्ध व्हावी, हा शासनाचा प्राधान्यक्रम आहे. १ हजार ४४० वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या नियुक्त्यांमुळे शासकीय आरोग्य यंत्रणा अधिक सक्षम होऊन ग्रामीण जनतेला वेळेवर उपचार मिळण्यास मदत होईल. नवनियुक्त डॉक्टरांनी सेवाभाव आणि रुग्णकेंद्रित दृष्टिकोन ठेवून काम करावे, असे आवाहनही त्यांनी केले.एकूणच, राज्यातील १ हजार ४४० वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या हा सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेच्या बळकटीकरणातील महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. विशेषतः ग्रामीण आणि दुर्गम भागांतील नागरिकांना दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने या नियुक्त्या कितपत परिणामकारक ठरतात, हे आगामी काळात स्पष्ट होणार आहे.

दुष्काळात सामान्य शेतमजुर आणि सुशिक्षित बेकरांच्या हक्कासाठी रिपाइं कंबर कसली

शेतमजुर आणि सुशिक्षित बेकरांची उपासमार रोखण्याची रिपाइंच्या शिष्टमंडळाची मागणी

दैनिक वादळ वार्ता
गौतम बचुटे । केज

शेतमजुर आणि सुशिक्षित बेकार यांची उपास मार रोखण्यासाठी आणि मजुरांच्या हाताला काम मिळवून देण्यासाठी रिपाइंचे तालुकाध्यक्ष दीपक कांबळे यांच्या नेतृत्वाखाली शेतमजुर महिला व सुशिक्षत तरुण यांनी तहसीलदार यांनी भेट घेऊन मागण्यांचे निवेदन सादर केले.

दि. ३ नोव्हेंबर रोजी केज तालुका रिपाइं आठवले गटाचे तालुकाध्यक्ष दीपक कांबळे यांच्यासह सरचिटणीस गौतम बचुटे, जेष्ठ नेते दिलीप बनसोडे, उपाध्यक्ष प्रशांत हजारे, शरद धिवार, विनोद शिंदे यांनी केज तालुक्यातील होळ आणि परिसरातील

शेतमजूर महिलांच्या सोबत तहसीलदार अशोक भंडारे यांची भेट घेऊन त्यांना मागण्याचे निवेदन सादर केले. निवेदनात स्वस्त धान्य योजनेद्वारे दिले जाणारे अन्नधान्य हे उत्तम दर्जाचे देण्यात यावे. शेतमजुर आणि मजुरांना दरमहा पाच हजार रु. तर सुशिक्षित बेकरांना प्रति महिना दहा हजार रु. अनुदान, तसेच बेकारी भत्ता आणि बेरोजगारांच्या हाताला काम देण्याची मागणी निवेदनात केली आहे.

गेल्या वर्षभरापूर्वी उद्घाटन झालेल्या पेनूर शेवडी रस्त्याचे काम पूर्णत्वास कधी जाणार

एका वर्षापासून रोडवर फक्त गीट्टी टाकून प्रवाशांना नाहक त्रास देणाऱ्या गुत्तेदारावर कारवाई होणार का?

दैनिक वादळ वार्ता
लोहा । राजकुमार पिल्लोळे

पेनूर ते शेवडी बाजीराव या रस्त्याच्या कामाचे उद्घाटन वर्षभरापूर्वी झालेले असून आजपर्यंत या रस्त्याचे काम पूर्ण न झाल्यामुळे या भागातील प्रवास करणाऱ्या प्रवाशांना आपला जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत आहे. गेल्या वर्षभरापासून या रोडवर फक्त गिट्टी टाकून रस्त्याचे काम बंद चालू बंद चालू करण्यात येत आहे. नांदेड येथील नामवंत कंट्रक्शन च्या माध्यमातून या रस्त्याच्या काम होत असून या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात फक्त गिट्टी टाकूनच त्यावर रोलर फिरवणे व काम बंद करून आपले सर्व साहित्य दुसऱ्या साईट च्या कामावर न्यायचे असेच गेल्या वर्षांपासून दिसत आहे. शासकीय अभियंता यांचे ही या कामाकडे साफ दुर्लक्ष दिसत असून आजही या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात गिट्टी दिसत आहे. त्यामुळे या रस्त्यावरून ये-जा करणाऱ्या प्रवाशांना आपला जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत आहे. विशेष करून मोटरसायकलवर प्रवास करणाऱ्या खाली उतरून पायाने चालावे लागत आहे. या परिसरात असलेले भोगाव येथील प्रसिद्ध मारोती मंदिर येथे दर शनिवारी हजारो भाविक याच रस्त्याने आपल्या परिवारा सह दर्शनासाठी येत असतात या रस्त्यामुळे मोठया प्रमाणात धुळीमुळे व या गिट्टी मुळे नाहक त्रास सहन करावा लागत असल्याचे दिसत आहे. तीन ते चार किलोमीटर रस्त्याचे काम पूर्ण करायला एक वर्ष होऊन ही हे काम पूर्ण का झाले नाही यांचे उत्तर संबंधित शासकीय अभियंता व या कामाचा गुत्तेदार यांनी द्यावे अशी मागणी व वर्षभरापासून सुरू असलेले हे रस्त्यांचे काम लवकरात लवकर डांबरीकरण करून हे काम पूर्ण करावे अशी मागणी प्रवासी वर्गातून होत आहे.

अविनाश पुरी यांना पितृशोक

दैनिक वादळ वार्ता
केज । प्रतिनिधी

मुंबई येथील कार्यालयात आयकर अधिकारी असलेले अविनाश पुरी यांचे वडील श्रीनिवास रामभाऊ पुरी (वय६२) यांचे दीर्घ आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्यावर केज तालुक्यातील साधला येथे त्यांच्या राहत्या घरी पारंपारिक पद्धतीने अंत्यसंस्कार करण्यात आले. मूळ केज तालुक्यातील साबला येथील रहिवासी असलेले श्रीनिवास रामभाऊ पुरी यांचे यांचे सोमवारी रात्री पाच वाजता शासकीय रुग्णालय धारूर येथे दीर्घ आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्यावर मंगळवारी सकाळी केज तालुक्यातील साबला येथील त्यांच्या राहत्या घरी पारंपारिक पद्धतीने त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. मृत्यू समयी त्यांचे वय ६२ वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी,आयकर अधिकारी अविनाश पुरी व अरविंद पुरी असा परिवार आहे.ते सुंदरराव सोळंके महाविद्यालयाचे प्राध्यापक लक्ष्मण गिरी यांचे मेहुणे होते. त्यांच्या अंत्यसंस्काराच्या वेळी गावातील नागरिक, नातेवाईक, मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा क्रांतीनगर शाळेच्या भौतिक सुविधांच्या विकासासाठी चार लाख रुपये विकास निधी मंजूर, विविध संघटनांच्या मागणीला यश

दैनिक वादळ वार्ता
केज । प्रतिनिधी

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा क्रांतीनगर ता.केज येथील विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी आणि शाळेच्या भौतिक सुविधांचा दर्जा सुधारण्यासाठी चार लाख रुपयांचा विकास निधी मंजूर करण्यात आला आहे.या निधी तून शाळेत शौचालय, पोषण आहारासाठी स्वतंत्र किचन शेड, आणि शालेय परिसरात पेव्हर ब्लॉक बसवण्यासह इतर विविध प्रलंबित कामे तातडीने पूर्ण केली जाणार आहेत.या भागातील सामाजिक कार्यकर्ते,माजी विद्यार्थी संघ आणि क्रांतीनगर भागातील नागरिकांच्या पाठपुराव्याला अखेर मोठे यश आले आहे.

क्रांतीनगर येथील जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांची संख्या उत्तम आहे,मात्र गेल्या काही दिवसांपासून येथे पुरेशा पायाभूत सुविधांची कमतरता जाणवत होती.शाळेत सुसज्ज शौचालय नसणे,माध्यान्ह भोजनासाठी योग्य किचन शेड

नसणे आणि पावसाळ्यात परिसरात चिखल होत असल्याने पेव्हर ब्लॉक ची असणारी गरज,या समस्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी क्रांतीनगर भागातील नागरिकांनी एकत्र येत प्रशासनाकडे लेखी मागणी केली होती.या मागणीची दखल घेत प्रशासनाने शाळेच्या कायापालटासाठी चार लाख रुपयांचा निधी मंजूर केला आहे.हा निधी मंजूर झाल्यामुळे शालेय व्यवस्थापन समिती,शिक्षक, विद्यार्थी आणि पालकांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे.हा निधी मंजूर करून आणण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते इरफान पठाण,माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष प्रेम गायकवाड,ज्येष्ठ मार्गदर्शक बाबुराव गालफाडे सर,आझाद क्रांती सेनेचे तालुका उपप्रमुख अनिल लोखंडे,तसेच अशोक मस्के,वाहेद तांबोळी, अजय गालफाडे, शाकेर शेख,साहिल तांबोळी,अमन पठाण, अभिषेक लोखंडे, नासेर तांबोळी,जाकेर शेख आणि यश गालफाडे आदींनी विशेष परिश्रम घेत सातत्याने पाठपुरावा केला होता.त्यांच्या या सामूहिक प्रयत्नांचे केज परिसरात कौतुक होत आहे.

संपादकीय

स्थानिक स्वराज्य संस्थांना निवडणुकांचा वनवास!

लोकशाहीचा खरा पाया हा गावपातळीवरील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये असतो. ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद या संस्था म्हणजे ग्रामीण विकासाच्या कारभाराची प्रमुख केंद्रे आहेत. मात्र, गेल्या काही वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका सातत्याने लांबणीवर पडत असल्याने लोकशाहीच्या विकेंद्रीकरणालाच ग्रहण लागल्याचे चित्र दिसत आहे. निवडणुका कधी होणार, लोकप्रतिनिधी कधी निवडून येणार आणि ग्रामीण भागातील विकासाला लोकनियुक्त नेतृत्व कधी मिळणार, असे अनेक प्रश्न आज जनतेसमोर उभे आहेत. आरक्षण, प्रभागरचना, न्यायालयीन प्रक्रिया आणि राजकीय समीकरणांच्या नावाखाली निवडणुकांचा प्रश्न प्रलंबित राहतो; मात्र या विलंबाची किंमत सामान्य जनतेला मोजावी लागते.लोकशाहीत पाच वर्षांचा कार्यकाळ निश्चित असताना निवडणुका वेळेत घेण्याची जबाबदारी पार पाडण्यात वारंवार विलंब का होतो, याचे उत्तर जनतेला मिळणे आवश्यक आहे. प्रशासकांच्या माध्यमातून कारभार चालवणे ही तात्पुरती व्यवस्था असू शकते; परंतु ती लोकनियुक्त प्रतिनिधींची जागा कधीच घेऊ शकत नाही. कारण प्रशासकीय यंत्रणा नियमांनुसार काम करते, तर लोकप्रतिनिधी जनतेच्या प्रश्नांना थेट सामोरे जातात. गावातील रस्ते, पाणीपुरवठा, आरोग्य, शिक्षण, स्वच्छता, घरकुल आणि विविध विकासकामांसाठी नागरिकांना आपल्या लोकप्रतिनिधींकडे अपेक्षेने पाहता येते. मात्र, निवडणुकाच नसतील तर जनतेच्या प्रश्नांना राजकीय व्यासपीठ मिळणार तरी कसे?निवडणुका लांबणीवर पडल्याने केवळ इच्छुक उमेदवारांची संधी हिरावली जात नाही, तर नव्या नेतृत्वाच्या उदयालाही खीळ बसते. निवडणुका जवळ आल्या की राजकीय पक्षांना जनतेची आठवण होते, इच्छुकांच्या भेटीगाठी वाढतात, विकासाच्या आश्वासनांची खैरात केली जाते; पण प्रत्यक्ष निवडणुकीचा विषय आला की तांत्रिक अडचणी आणि राजकीय गणितांचा पाढा सुरू होतो. हा विरोधाभास लोकशाहीसाठी निश्चितच चिंताजनक आहे.विशेषतः ग्रामीण भागात जिल्हा परिषद आणि पंचायत समिती या संस्था विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या आहेत. या संस्थांमार्फत ग्रामीण भागातील मूलभूत सुविधांना दिशा मिळते. त्यामुळे लोकनियुक्त प्रतिनिधी नसणे म्हणजे ग्रामीण विकासाच्या निर्णयप्रक्रियेत जनतेचा थेट सहभाग कमी होणे होय. निवडणुका वेळेत घेणे ही केवळ राजकीय इच्छेची बाब नसून घटनात्मक जबाबदारी आहे. आरक्षणाचा प्रश्न असो किंवा प्रभागरचनेचा, त्यावर कायदेशीर मार्गाने वेळेत तोडगा काढणे आवश्यक आहे. न्यायालयीन प्रक्रियेचा सन्मान राखतानाच निवडणूक आयोग आणि शासनाने निवडणुकांचा कार्यक्रम अनिश्चित काळासाठी प्रलंबित राहणार नाही, याची काळजी घेतली पाहिजे.लोकशाही ही केवळ सत्तेच्या खुर्चीपुरती मर्यादित नसते, तर ती जनतेच्या सहभागातून आणि उत्तरदायित्वातून बळकट होत असते. स्थानिक स्वराज्य संस्थांना निवडणुकांचा वनवास देऊन लोकशाही मजबूत होणार नाही. प्रशासकीय राजवटीपेक्षा लोकनियुक्त प्रतिनिधींचा कारभार हाच लोकशाहीचा खरा आत्मा आहे. त्यामुळे आता निवडणुकांच्या तारखांबाबत केवळ आश्वासने नकोत, तर ठोस निर्णय हवा. कारण जनतेला प्रशासक नकोत, जनतेतून निवडून आलेले आणि जनतेला उत्तरदायी असलेले लोकप्रतिनिधी हवे आहेत. लोकशाहीचा पाया निवडणुकांनीच मजबूत होतो; तो अनिश्चिततेच्या अंधारात ठेवणे म्हणजे जनतेच्या अधिकारांनाच प्रतीक्षेत ठेवणे होय!

चारगाव बडगेतील अवैध धंद्यांचे सूत्रधार पोलीस पाटील?

दैनिक वादळ वार्ता
सुनिल गेडाम । सिंदेवाही

चारगाव बडगे परिसरात अवैध मोहासडव्याचा मोठा साठा जप्त करून सिंदेवाही पोलिसांनी केलेली कारवाई निश्चितच अभिनंदनीय आहे. गोपनीय माहितीच्या आधारे अवैध धंद्यांवर धडक कारवाई होत असेल, तर त्याचे स्वागतच केले पाहिजे. मात्र, या कारवाईतून एक महत्त्वाचा प्रश्न समोर येतोय–अवैध दारूचा साठा सापडतो, मुद्देमाल जप्त होतो, पण पोलिस प्रशासनाने लागलीच कोणाचा आहे यावर शिक्का करत त्याला आरोपी च्या पिंजऱ्यात उभं करून मोकळे झाले , हा पोलीस प्रशासनाचा भाग असेलच यात दुमत नाही पण पोलीस प्रशासनाच्या कारवाही करत असताना आरोपी समोर करून फोटो घेतल्या जाते , पण सदर प्रकरणात आरोपी पोलीस प्रशासन यांनी ठरवला व कारवाही झाली तेव्हा तो उपस्थित नव्हता मग तो त्याचच होता हा निष्कर्ष पोलीस प्रशासन यांनी कसा काढला हे त्याच्या तपासाचा भाग असेल यात दुमत नाही.
पोलीस प्रशासन यांच्या कारवाही वर शंका नाही पण पोलीस पाटील यांच्या वर कारवाही का केली नाही,हा मुख्य प्रश्न आहे, कारण ज्या गावाच्या हद्दीत अवैध दारू साठा जप्त होईल त्या पोलीस पाटील हा जबाबदार असेल मग या शासनाच्या परिपत्रकाचा बहुतेक पोलीस प्रशासनाला विसर पडला असेल आणि तो विसर पडणे अत्यंत गरजेचे आहे नक्कीच या बाबत अभिनंदन काही प्रकरण असे असतात त्याचा शोध घेण्यासाठी पोलीस प्रशासन महिने महिने शोध घेण्यासाठी प्रयत्न करावे लागतात
ही सत्यता आहे.गोर गरीब नागरिकांना न्याय मिळाला असे सांगताच येत नाही .
अचानक दारू साठा सामान्य नागरिक यांच्या समोर जर उघड झाला तर तो कुणाचा याचा तपास काही वेळात होतो
हे पोलीस प्रशासन कडून न उमजणार कोड आहे आणी या प्रश्नाचे उत्तर कधीच मिळणार नाही.कारण मला माहीत आहे त्यामुळे एक प्रश्न विचारवा वाटला की त्या गावच्या हद्दीत इतका मोठा अवैध मोहफुल दारू साठा बाबत पोलीस पाटील काय झक मारत होता का ?
वाघ निघाला ही अफवा झाली आणि त्यामुळे तो अवैध साठा हाती लागला .त्यावेळी तो कुणाचा याचा पुरावा काही क्षणात पोलीस प्रशासन समोर आला .मग त्याला आरोपी म्हणून एफ आय आर मधे नोंद केली पण मुख्य सूत्रधार पोलीस पाटील हा पोलिस प्रशासन यांच्या नजरेतून का सुटला हा सुद्धा प्रश्न आहे , मुख्य सूत्रधार पोलीस पाटील का नाही,गावपातळीवर या अवैध व्यवसायाची माहिती पोलीस प्रशासन पर्यंत पोहचवत नसेल तर मग या मागचा सूत्रधार पोलीस पाटील का नाही ,चारगाव बडगेतील नागरिकांच्या मनात हाच प्रश्न निर्माण होत असून, तो दुर्लक्षित करून चालणार नाही. एका बाजूला पोलिसांनी जंगल परिसरातून मोठ्या प्रमाणात मोहासडवा जप्त केला. दुसऱ्या बाजूला गावात नेमके काय सुरू आहे, अवैध दारूचा व्यवसाय मधे पोलीस पाटील याची चौकशी का नाही .
नियम सर्वांसाठी समान असतील, तर चौकशीही सर्व संबंधितांच्या भूमिकेची झाली पाहिजे. सामान्य नागरिक असो किंवा जबाबदारीच्या पदावर असलेली व्यक्ती–दोष सिद्ध झाल्यास कायद्यानुसार कारवाई आणि दोष नसल्यास निष्पक्ष चौकशीतून स्पष्टता, हीच न्यायाची खरी कसोटी आहे.आता नागरिकांचे लक्ष सिंदेवाही पोलीस प्रशासनाच्या पुढील भूमिकेकडे लागले आहे. कारवाईचे स्वागत करतानाच, पोलीस पाटील याची निष्पक्ष चौकशी करून सत्य जनतेसमोर आणले जाणार का, याचे उत्तर सिंदेवाही पोलीस प्रशासन यांना द्यावेच लागेल .कारण बातमी संपत नाही जोपर्यंत तिच्या प्रश्नाला उत्तर मिळत नाही!सिंदेवाही पोलीस प्रशासन यांच्यावर अजिबात शंका नाही फक्त इतकाच सांगाव की चारगाव बडगे मधील पोलीस पाटील यांनी अवैध व्यवसाय याची गोपनीय माहिती किती वेळा दिली .
(पोलीस पाटील हा दिवसभर गावात उपस्थित राहत नाही तो आपल गाव सोडून पळसगाव जाट मधील ग्राम पंचायत चाळीत असतो ही सत्यता आहे)

सातपुड्यात आरोग्यवर्धक रानभाजींची रेलचेल

औषधी गुणधर्म। सातपुड्यातील षौष्टिक व औषधी गुणधर्म असलेल्या रानभाज्या बेदखल

दैनिक वादळ वार्ता
रवींद्र वळवी । मोलगी

चवदारच नव्हे तर औषधी गुणधर्म असणाऱ्या पौष्टिक रानभाज्या सातपुड्यात दऱ्या खोऱ्यात मुबलक प्रमाणात मिळत आहेत. त्या रानावनात नैसर्गिकरित्या उगवलेल्या असल्याने त्या सातपुड्याच्या मोलगी व धडगाव परिसरात अगदी निशुल्क उपलब्ध झाल्या आहेत. या रानभाज्या निशुल्क मिळत असल्याने या भाज्यांची खरी किंमत कळत नाही, परंतु त्या अनेक आजारांवर उपायकारक आहे. या भाज्यांची प्रशासकीय पातळीवर विकासाच्या दिशेने दखल घेणे अपेक्षित आहे. सातपुड्यात अनेक औषधी गुणधर्म असलेल्या वनस्पती, झुडूपे आढळून येतात, त्यापैकी बहुतांश वनस्पतींचा पाला, फुले, फळे यांचा खाद्यान्न म्हणून वापर होत आहे. या खाद्यान्नचा आदिवासींमधील विविध मौखिक साहित्यांमध्ये उल्लेख होतांना दिसत आहे. प्रामुख्याने डाब राजमंडलच्या कहाण्या, गितांसह पारंपरिक लग्नगिते, होळी गीतांमध्येही होत आहे. या रानभाज्यांचा पिढ्यानपिढ्यान अन्न म्हणून वापर केला जात आहे. त्यामुळे या भाज्यांचा शोध आदिवासींच्या पूर्वजांनीच लावला आहे हे सिद्ध होत आहे. सुरुवातीच्या काळात मानवाला अन्न हे जंगल व आसपासच्या परिसरातूनच मिळत असे. यात

औषधी गुणधर्म असलेल्या सातपुड्यात अनेक वनस्पतीं आढळून येतात. खाद्यान्न म्हणून वापर होणार्या वनस्पतींपैकी कुठलीही एक भाजी आहारात घेतल्यास भाजीचे सेवन करणाऱ्या व्यक्तीला सहसा कुठल्याही आजाराची लागण होत नाही. या वनस्पतींसह सातपुड्यात उत्पादित होणारी भगर, भादी, मोर हे घटक आहारात घेतल्यास मानवाचे आयुष्यमान वाढण्यास देखील मदत होत आहे.
–जोब्या जेगला वळवी
शेतकरी, असली ता.धडगाव

कंदमुळे, जंगलातून अपोआप मिळणारी फळे व रानभाज्यांचा समावेश होतो. माणसाने शेती करायला सुरु वात केली, त्याच्या खानपानाच्या सवयी बदलल्याचे दिसून येत आहे.
शहरी भागात कृषीव्यवस्थेच्या बदलामुळे कोबी, फ्लॉवर, सिमला मिरची तसेच विविध विदेशी भाज्या मिळत असल्या तरी सातपुड्यातील आदिवासी बांधव ऋतू व काळानुरुप पोवाळ्या (सनाम), माठला, उखीवळा, आंबाडा, शेल्टा, शेवगी पाला, उंबरपाला, सिचपाला, मोखं, सिरीवाटा यासह अनेक वनस्पतींचा पाला, फुले, मुळे व फळे दैनंदिन आहारातील खाद्यान्न म्हणून वापर करीत आहेत. या भाज्यां धडगाव व मोलगी भागात सहज मिळत असून त्यामुळे आदिवासी बांधवांना कुठलीही किंमत मोजावी लागत नाही त्यात कंदवर्गीय, झुडूपवर्गीय, वेलवर्गीय, वृक्षवर्गीयांसह आळंबीही उपलब्ध होते. परंतु आळंबी काही अंशी कालबाह्य देखील ठरत आहे. या भाज्यांच्या विकासासाठी उपाययोजना होणे आवश्यक आहे.
जैव विविधता पडताळली जावी...
रानभाज्यांचा प्रशासकीय पातळीवर दखल घेत त्यातील औषधी गुणधर्म पडताळून पाहणे गरजेचे आहे. रानभाज्या या ठराविक मातीत व वातावरणातच उपलब्ध होतात. त्यामुळे या नैसर्गिक संपत्तीतील जैव विविधता ओरबाडली जाणार नाही, याची दक्षताही घेतली गेली पाहिजे. या भाज्या रानभाज्या असल्या तरी त्यांचीही शेती करता येऊ शकते का? या दिशेने प्रशासनाचे पाऊल पडल्यास या भाज्या निश्चितच विकासाच्या वाटेवर येतील पर्यायाने प्रत्येक घटकातील बांधवांना पौष्टिक तथा औषधी गुणधर्म असलेल्या भाज्या उपलब्ध होतील. त्यातून आरोग्यदायी समाज निर्माण होईल. शिवाय दुर्गम भागातील आदिवासी बांधवांना त्यातून रोजगार देखील उपलब्ध होऊ शकेल.
काही भाज्या शेतात नव्हे जंगलातच वाढतात
सातपुड्यात आढळून येणाऱ्या वनस्पतीपैकी बहुतांश वनस्पतीं या नैसर्गिकरित्या रानातच वाढतात. त्याची शेती केल्यास किंवा त्याची बागेत लागवड केल्यास त्या वाढत नाही. त्यामुळे सातपुड्यातील आदिवासी बांधव काही भाज्यांचा साठा करीत नाही. किंवा त्यांच्या बियाही साठवून ठेवत नाही. प्रशासकीय पातळीवर या भाज्यांचा विकास करतांना अशा काही भाज्यांचीही निवड होणे काळाची गरज आहे.

अजितदादा असते तर घात करण्याची कुणाची हिंमत झाली असती का?

सतीश चव्हाणांचा पराभवावरून महायुतीतील नेत्यांना सूचक इशारा

दैनिक वादळ वार्ता
छत्रपती संभाजीनगर (वृत्तसंस्था)

विधानपरिषद निवडणुकीत मराठवाडा पदवीधर मतदारसंघातून पराभवाचा सामना करावा लागल्यानंतर माजी आमदार सतीश चव्हाण यांनी कार्यकर्त्यांशी संवाद साधत आपली भूमिका स्पष्ट केली. या पराभवाला त्यांनी साधा राजकीय पराभव न मानता घात झाल्याचे म्हटले आहे. तसेच या निवडणुकीतील सर्वात मोठा टर्निंग पॉईंट म्हणजे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांची अनुपस्थिती असल्याचे त्यांनी सांगितले. 'अजितदादा असते तर घात करण्याची कुणाची हिंमत झाली असती का?' असा सवाल करत त्यांनी अप्रत्यक्षपणे महायुतीतील काही नेत्यांच्या भूमिकेवर नाराजी व्यक्त केली.पराभवानंतर सतीश चव्हाण यांनी कार्यकर्त्यांचा मेळावा आयोजित केला होता. या मेळाव्याला मराठवाड्यातील विविध जिल्ह्यांमधील पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. आमदार विक्रम काळे यांचीही यावेळी उपस्थिती होती. निवडणुकीच्या निकालानंतर कार्यकर्त्यांशी संवाद साधताना चव्हाण यांनी प्रचारातील त्रुटी, विरोधकांची रणनीती, महायुतीतील अंतर्गत विरोध आणि अजित पवार यांच्या अनुपस्थितीचा निवडणुकीवर झालेला परिणाम अशा विविध मुद्द्यांवर भाष्य केले.कार्यकर्त्यांशी संवाद साधताना सतीश चव्हाण म्हणाले, की नेमके काय बोलावे आणि कुठून सुरुवात करावी, हे समजत नाही. अनेक कार्यकर्त्यांना भेटायचे होते आणि त्यांच्याशी संवाद साधायचा होता. त्यामुळे हा मेळावा आयोजित केला. मात्र, झालेला पराभव आपल्याला मान्य नसल्याचे सांगत त्यांनी हा घात असल्याची भावना व्यक्त केली.निवडणुकीच्या प्रचाराचे तंत्र बदलत असल्याचे आपण यापूर्वीही सांगितले होते. आपण पारंपरिक पद्धतीने काम करत राहिलो; मात्र विरोधकांनी बदललेल्या प्रचारतंत्राचा प्रभावी वापर केला. त्यामुळे काहीतरी गडबड होऊ शकते, याचा अंदाज असूनही आपण त्याकडे गांभीर्याने लक्ष दिले नाही, अशी खंत त्यांनी व्यक्त केली.'मी १८ वर्षे काम केले, हीच माझी चूक वाटते. अवघे १५ दिवस काम करून काही लोकांना ८० हजार मते मिळाली. याचा हिशेब आपण योग्य वेळी घेऊ,' असे म्हणत त्यांनी निवडणुकीतील बदललेल्या समीकरणांकडे लक्ष वेधले.या निवडणुकीतील पराभवाचे विश्लेषण करताना सतीश चव्हाण यांनी अजित पवार यांच्या अनुपस्थितीचा मुद्दा उपस्थित केला. त्यांच्या मते, या निवडणुकीतील सर्वात मोठा टर्निंग पॉईंट म्हणजे अजितदादा नसणे हा होता.'अजितदादा असते तर कुणाची हिंमत

झाली असती का घात करण्याची? दादा असते तर विश्वास तोडण्याची कोणाचीच हिंमत झाली नसती,' असे म्हणत त्यांनी निवडणुकीत झालेल्या कथित दगाबाजीवर नाराजी व्यक्त केली.दरम्यान, पराभवानंतर आपण राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या सुनेत्रा पवार यांची भेट घेतल्याचेही त्यांनी सांगितले. या भेटीत सुनेत्रा पवार यांनी आपल्याला धीर दिला. 'सतीशराव, तुमची तर एक निवडणूक झाली; माझी तर रोज निवडणूक आहे. दादा नाहीत, मी कसं करत असेल,' असे सुनेत्रा पवार म्हणाल्याचे चव्हाण यांनी कार्यकर्त्यांना सांगितले.पराभवानंतरच्या पुढील राजकीय भूमिकेबाबत बोलताना चव्हाण यांनी सूचक विधान केले. आपण सहसा अशा प्रकारचे कार्यक्रम करत नाही; मात्र आता प्रत्येकाचा कार्यक्रम करावा लागेल, असे ते म्हणाले. 'मी वेडा नाही. आता सगळं मनात ठेवणार आणि वेगळा कार्यक्रम करणार,' असे विधान करत त्यांनी भविष्यातील राजकीय रणनीतीचे संकेत दिले.या विधानातून निवडणुकीत आपल्याला मदत न करणाऱ्या किंवा पडद्यामागून विरोध करणाऱ्यांची भूमिका लक्षात ठेवणार असल्याचा संदेश त्यांनी दिल्याचे मानले जात आहे. मात्र, याबाबत त्यांनी कोणाचेही नाव स्पष्टपणे घेतले नाही.पद असो किंवा नसो, कार्यकर्त्यांसाठी आपले दरवाजे कायम खुले राहतील, असे आश्वासनही त्यांनी दिले. केवळ ४०० लोकांना बोलावले असतानाही मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित राहिल्याने त्यांनी समाधान व्यक्त केले. वैयक्तिक असो किंवा सार्वजनिक काम, कार्यकर्त्यांसाठी आपण नेहमी उपलब्ध राहू, असेही त्यांनी स्पष्ट केले.

फुलेपिंपळगाव येथे 'भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म' ग्रंथवाचन सोहळा उत्साहात संपन्न

सिद्धांत समाधान साळवे यांचा ग्रंथवाचक म्हणून सन्मान; भन्ते, पिंडोल थेरो व भन्ते उपाली यांची धम्मदेसना

दैनिक वादळ वार्ता

माजलगाव । विजय डावरे

भारतीय बौद्ध महासभा व सम्राट अशोक बौद्ध मंडळ, फुलेपिंपळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, दि. १ नोव्हेंबर २०२६ रोजी फुलेपिंपळगाव येथील बुद्ध विहारात 'भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म' या ग्रंथवाचन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. हा सोहळा अत्यंत उत्साहपूर्ण व धम्ममय वातावरणात संपन्न झाला.कार्यक्रमाच्या प्रारंभी सकाळी ८ वाजता पूज्य भन्ते पिंडोल यांच्या हस्ते पंचरंगी धम्मध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर दुपारी १.०० वाजता पुज्य भन्ते पिंडोल थेरो व पूज्य भन्ते उपाली यांनी धम्मदेसना दिली. भगवान गौतम बुद्धांचा प्रज्ञा, शील, करुणा, समता आणि मानवतेचा संदेश त्यांनी उपस्थितांना समजावून सांगितला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भारतीय बौद्ध महासभेच्या माजलगाव तालुका महिला अध्यक्षा आदरणीय मंदाताई साळवे होत्या. यावेळी 'भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म' या ग्रंथाचे वाचन करणारे आयु. सिद्धांत समाधान साळवे यांचा विशेष सन्मान करण्यात आला.या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून भारतीय बौद्ध महासभेच्या महिला जि.संघटक आद.शोभाताई भोजनें, वंचीत बहुजन आघाडीचे नेते धम्मानंद साळवे, भारतीय बौद्ध महासभेचे ता अध्यक्ष डॉ. भागवत साळवे, ता.संरक्षण सचिव दयानंद साळवे, ता.संस्कार सचिव राजेभाऊ साळवे, ता.संघटक मोहन काकडे, कौशल्या गायकवाड, भाटवडगाव चे शाखा अध्यक्ष राजेभाऊ साळवे, माजी सरपंच अभिमन्यु साळवे, फुलेपिंपळगाव शाखा अध्यक्ष कालीदास साळवे, संपत दादा साळवे,बहूजन समाज पार्टी चे हरिभाऊ साळवे यांची उपस्थिती होती.
या सोहळ्याला फुलेपिंपळगाव व परिसरातील धम्म उपासक-उपासिका, महिला, युवक आणि ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण परिसरात धम्ममय वातावरण निर्माण झाले होते.भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म या ग्रंथाच्या वाचनातून बुद्धांचे तत्त्वज्ञान, वैज्ञानिक दृष्टिकोन, समता, बंधुता, स्वातंत्र्य आणि मानवतावादी विचार समाजापर्यंत पोहोचविण्याचा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी विशाल साळवे, अरुण साळवे, सचिन साळवे, प्रल्हाद खरात, समाधान साळवे, वृंदावनी साळवे, राधाबाई भाग्यवंत ,साखरबाई साळवे, वंदना साळवे, चतुराबाई साळवे, वंचाबाई साळवे, सह भारतीय बौद्ध महासभा व सम्राट अशोक बौद्ध मंडळ, फुलेपिंपळगाव येथील पदाधिकारी, कार्यकर्ते आणि धम्म उपासकांनी विशेष परिश्रम घेतले.

अशोक पांचाळ यांना विद्यापीठाचे रौप्यपदक अनुष्का पांचाळची जिल्हास्तरीय परीक्षेसाठी निवड

सिरसाळा येथे परमेश्वर पांचाळ यांच्या उपस्थितीत विश्वकर्मा सुतार समाज संघटनेची स्थापना

दैनिक वादळ वार्ता

माजलगाव । विजय डावरे

शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या समाजातील गुणवंतांचा गौरव आणि सामाजिक संघटनात्मक बांधणीच्या उद्देशाने शिरसाळा येथे श्री विश्वकर्मा सुतार समाज संघटनेची स्थापना करण्यात आली. यावेळी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथून विधी (लॉ) पदवीच्या तीन वर्षांच्या अभ्यासक्रमात द्वितीय क्रमांक मिळवून रौप्यपदकाचे मानकरी ठरलेले अशोक दामोदर पांचाळ तसेच जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, कोथरूळ येथील विद्यार्थिनी कु. अनुष्का हनुमंत पांचाळ हिची जिल्हास्तरीय इसो परीक्षेसाठी माजलगाव तालुक्यातून निवड झाल्याबद्दल सुतार समाजाच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला.अशोक दामोदर पांचाळ यांनी एप्रिल २०२६ मध्ये झालेल्या विद्यापीठाच्या परीक्षेत विधी पदवीच्या तीन वर्षांच्या अभ्यासक्रमात विद्यापीठातून द्वितीय क्रमांक मिळवत रौप्यपदक पटकावले. त्यांच्या या यशाबद्दल समाजबांधवांनी त्यांचे अभिनंदन केले. तसेच कु. अनुष्का हनुमंत पांचाळ हिने शैक्षणिक क्षेत्रात मिळवलेल्या यशाची दखल घेत तिचा सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.याच कार्यक्रमात श्री विश्वकर्मा सुतार समाज संघटनेच्या नवीन कार्यकारिणीची स्थापना करण्यात आली. यामध्ये अध्यक्षपदी उत्तम अण्णाभाऊ पांचाळ, उपाध्यक्षपदी श्रीराम महादेव पांचाळ, सचिवपदी ओमकार अभिमान पांचाळ, सहसचिवपदी महादेव संदीपान पांचाळ, तर कोषाध्यक्षपदी चंद्रसेन उत्तमराव पांचाळ यांची निवड करण्यात आली.
यावेळी कार्यकारिणी सदस्य म्हणून हनुमंत रामभाऊ पांचाळ, महारुद्र ईश्वर पांचाळ, पांडुरंग रामकिसन पांचाळ, बापूराव हरिभाऊ पांचाळ, साखरे भीमाशंकर वामनराव, सुरेश अशोक पांचाळ आणि अनुज सुभाषराव देशमुख यांचा समावेश करण्यात आला. अनिल पांचाळ सर यांनी मार्गदर्शक म्हणून जबाबदारी स्वीकारली.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी परमेश्वर पांचाळ (आमसुले) होते. प्रमुख उपस्थितीमध्ये एन. डी. रत्नपारखे सर आणि सचिव अशोक दिगंबरे यांच्यासह माजलगाव विश्वकर्मा प्रतिष्ठानचे पदाधिकारी, समाजबांधव आणि माता-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.गुणवंतांचा सन्मान, विद्यार्थ्यांना प्रोत्साहन आणि समाजाची संघटनात्मक एकजूट या त्रिसूत्रीवर आधारित या उपक्रमाचे समाजबांधवांनी स्वागत केले. नवनिर्वाचित कार्यकारिणीचे माजलगाव विश्वकर्मा प्रतिष्ठानच्या वतीने अभिनंदन करून पुढील सामाजिक कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

माजलगाव येथे 'सचिन सर्जिकल ॲण्ड एजन्सी'चा भव्य शुभारंभ; विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती

दैनिक वादळ वार्ता

माजलगाव । विजय डावरे

शहर व परिसरातील नागरिकांना वैद्यकीय सेवा व सर्जिकल साहित्याची सोय उपलब्ध करून देण्यासाठी 'सचिन सर्जिकल ॲण्ड एजन्सी' या नवीन व्यवसायाचा भव्य शुभारंभ रविवार, १ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता मोठ्या उत्साहात संपन्न झाला. सचिन रत्नेश्वर डिग्रसकर व शरद भारतराव डोंगरे यांच्या या नवीन उपक्रमाचे शहरात सर्वत्र कौतुक होत असून, विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी उपस्थित राहून या नवीन व्यवसायाला उदंड यश मिळण्यासाठी शुभेच्छा दिल्या.या कार्यक्रमाचे अध्यक्षपद माजलगाव विधानसभेचे आमदार आमदार प्रकाशदादा सोळंके यांनी भूषविले, तर उद्घाटन सोहळा मेडिकल असोसिएशन बीडचे अध्यक्ष अरुणदादा बरकसे यांच्या शुभहस्ते पार पडला.यावेळी प्रमुख अतिथी म्हणून माजलगावचे माजी आमदार मा.आ. राधाकृष्ण अण्णा होके पाटील, छत्रपती सहकारी साखर कारखान्याचे व्हा. चेअरमन मोहनदादा जगताप, बहुजन विकास मोर्चाचे संस्थापक अध्यक्ष बाबुरावजी पोटभरे, उपनगराध्यक्ष सहालबैय्या चाऊस, माजी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुरेश साबळे सर, मराठवाडा चेंबर ऑफ ट्रेड अँड कॉमर्सचे अध्यक्ष सुरेंद्र रेदासणी, सुंदरराव सोळंके सहकारी साखर कारखान्याचे व्हा. चेअरमन जयसिंगभैय्या सोळंके, माजी सभापती युद्धजीतदादा पंडीत, केमिस्ट अँड ड्रजिस्ट असोसिएशनचे तालुका उपाध्यक्ष श्रीनिवास टवाणी, युवा नेते राहुलकाका जगताप, मराठवाडा पेन्शनर्स फेडरेशनचे अध्यक्ष सुनील साखरे आणि भाजप तालुका मंडळ अध्यक्ष विनायकमामा रत्नपारखी हे प्रामुख्याने उपस्थित होते.

डॉक्टर, व्यावसायिक व नगरसेवकांची मोठी उपस्थिती

या सोहळ्याला शहरातील नामवंत डॉक्टर्स, लोकप्रतिनिधी आणि केमिस्ट अँड ड्रजिस्ट असोसिएशनचे सर्व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये डॉ.ज्ञानेश्वर गिलबिले, डॉ.श्रेयस देशपांडे, डॉ.गणेश सुरवसे, डॉ.गणेश बाबरे, डॉ.शिवाजी मिठे, डॉ.आनंद लोढा, नगरसेवक भारतजिजा होके, बिलालदादा चाऊस, लतिफभैय्या सय्यद, अमोल सरोदे, अमोल (इम्रानभैय्या) खान, तसेच केमिस्ट अँड ड्रजिस्ट असोसिएशनचे जावेद सय्यद, महेश बजाज, संदीप रुद्रवार, स्मितेश छिद्रवार, संदीप शिनगारे, रामविलास मालपाणी, अतुल शेंडे, प्रदिप कर्डिले यांच्यासह अनेक व्यापारी, उद्योगपती व राजकीय-सामाजिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे आयोजक संजय रत्नेश्वर डिग्रसकर, सचिन रत्नेश्वर डिग्रसकर व शरद भारतराव डोंगरे यांनी उपस्थित सर्व मान्यवरांचे, डॉक्टरांचे व मित्रपरिवाराचे आभार मानले. उपस्थितांनी सचिन सर्जिकल ॲण्ड एजन्सीच्या पुढील वाटचालीस उदंड शुभेच्छा दिल्या.

करडखेड जि.प.सर्कल मध्ये मिलिंद सोनकांबळे कावळगावकर यांच्या नावाची जोरदार चर्चा

आमदार हेमंत पाटील व बालाजी पाटील खतगावकर यांचा आशीर्वाद

दैनिक वादळ वार्ता

देगलूर । मारोती कुडकेवार

करडखेड जिल्हा परिषद सर्कल अनुसूचित जाती महिला राखीव असल्यामुळे शिवसेना शिंदे गटाकडून मिलिंद सोनकांबळे कावळगावकर यांची पत्नी सौ. सुप्रिया मिलिंद सोनकांबळे कावळगावकर यांच्या नावाची जोरदार चर्चा आहे. त्यांनी उच्चशिक्षित पदवीधर असल्याने त्यांना पतीच्या सामाजिक कामाची जाणीव आहे. त्यांच्या पतीचे युवा नेतृत्व म्हणून जनतेशी जोडलेले व्यक्तिमत्त्व; गरीब, गरजूंच्या मदतीसाठी सुख-दुःखात धावून जाणारी ओळख आहे.
करडखेड जिल्हा परिषद सर्कलमध्ये सध्या मिलिंद सोनकांबळे कावळगावकर यांच्या नावाची जोरदार चर्चा होताना दिसत आहे. युवा वर्गाशी असलेला संपर्क, सर्वसामान्य नागरिकांशी जिव्हाळ्याचे संबंध आणि गरीब, गरजू जनतेच्या सुख-दुःखात सहभागी होण्याची भूमिका यामुळे ते परिसरात परिचित होत आहेत. गावातील सामान्य माणसाच्या अडचणी समजून घेणे, गरजू लोकांना मदतीसाठी धावून जाणे, सामाजिक कार्यक्रमांमध्ये सहभाग घेणे आणि जनतेच्या प्रश्नांना महत्त्व देणे, अशा विविध माध्यमांतून त्यांनी लोकांशी आपले संबंध जोडले आहेत.
राजकारण हे केवळ पदासाठी नसून समाजातील शेवटच्या घटकापर्यंत मदतीचा हात पोहोचवण्यासाठी असावे, अशी भूमिका त्यांच्या सामाजिक कार्यातून दिसून येते. म्हणून शिवसेनेचे नेते आमदार हेमंत पाटील व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे खाजगी सचिव बालाजी पाटील खतगावकर यांचा समाजसेवा करण्यासाठी भक्कम आशीर्वाद असल्याच सांगण्यात येत आहे.म्हणून युवा पिढीशी संवाद साधत सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचा त्यांचा प्रयत्न परिसरात चर्चेचा विषय ठरत आहे.मिलिंद सोनकांबळे कावळगावकर यांची करडखेड जिल्हा परिषद सर्कलमधील सामाजिक वाटचाल आणि जनतेशी असलेली नाळ याकडे सध्या अनेकांचे लक्ष लागले आहे.

तृतीयपंथीयांच्या हक्कांसाठी लढणाऱ्या डॉ.सान्वी जेठवाणी यांचा आंतरराष्ट्रीय गौरव

'रेक्स कर्मवीर चक्र पुरस्कार-ब्लू मेडल'ने सन्मानित सामाजिक कार्याला जागतिक स्तरावर मान्यता

दैनिक वादळ वार्ता

मुंबई । प्रतिनिधी

तृतीयपंथी समुदायाचे हक्क, सामाजिक न्याय आणि LGBTQIA+ समुदायाच्या सन्मानासाठी सातत्याने लढा देणाऱ्या महाराष्ट्र राज्य तृतीयपंथी हक्क व कल्याण मंडळाच्या सह-उपाध्यक्षा डॉ. सान्वी जेठवाणी यांना प्रतिष्ठेचा 'रेक्स कर्मवीर चक्र पुरस्कार - ब्लू मेडल' प्रदान करून गौरविण्यात आले. त्यांच्या सामाजिक कार्याची आंतरराष्ट्रीय स्तरावर दखल घेतल्याने महाराष्ट्राच्या सामाजिक क्षेत्रात अभिमानाची भर पडली आहे.Color Positive Foundation आयोजित "Color Positive Fashion Pageant २०२६' या कार्यक्रमात Rex Karmaveer Global Fellowship आणि Rex Karmaveer Chakra awards यांच्या सहकार्याने हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.डॉ. जेठवाणी या गेल्या अनेक वर्षांपासून तृतीयपंथी समुदायाला शिक्षण, रोजगार, आरोग्य, आर्थिक स्वावलंबन आणि शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी कार्यरत आहेत. सामाजिक प्रतिष्ठा, समान हक्क आणि सन्मानाचे जीवन मिळावे, यासाठी त्या शासन व प्रशासन स्तरावर सातत्याने पाठपुरावा करीत आहेत.हा पुरस्कार माझ्या एकटीचा सन्मान नसून संपूर्ण तृतीयपंथी समुदायाच्या संघर्षाला आणि स्वाभिमानाला मिळालेली मान्यता आहे. समाजात समानता, सन्मान आणि न्याय प्रस्थापित होईपर्यंत माझे सामाजिक कार्य सुरूच राहील, अशी भावना डॉ. सान्वी जेठवाणी यांनी पुरस्कार स्वीकारताना व्यक्त केली.त्यांच्या या सन्मानामुळे तृतीयपंथी समुदायाच्या हक्कांसाठी सुरू असलेल्या लढ्याला नवी ऊर्जा मिळाली असून, सामाजिक समावेशन आणि समानतेच्या दिशेने कार्य करणाऱ्यांसाठी हा गौरव प्रेरणादायी ठरणार आहे.

परळीत बेकायदेशीर सावकारीचा पर्दाफाश! सहकार विभागाच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल,बीड जिल्ह्यात आठवडाभरात दुसरा गुन्हा; परवाना नसताना आर्थिक व्यवहार केल्याचा आरोप; चौकशी,पंचनामा अन् घरझडतीनंतर सहकार विभागाची कारवाई

दैनिक वादळ वार्ता

परळी । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात बेकायदेशीर सावकारी चा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून परळी तालुक्यातील तळेगाव येथे सावकारी परवान्याशिवाय आर्थिक व्यवहार केल्याच्या आरोपा वरून विठ्ठल गणपती फुंदे यांच्या विरुद्ध परळी ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहकार विभागाच्या तक्रारीवरून महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ अंतर्गत ही कारवाई करण्यात आली आहे. विशेष म्हणजे बीड जिल्ह्यात आठवडा भरात बेकायदेशीर सावकारी प्रकरणी दाखल झालेला हा दुसरा गुन्हा असल्याने अवैध सावकारी करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.
मिळालेल्या कागदपत्रां नुसार,तळेगाव येथील फुलचंद रामराव मुंडे यांनी दि.७ फेब्रुवारी २०२४ रोजी विठ्ठल गणपती फुंदे यांच्या विरोधात बेकायदेशीर सावकारी व्यवसाया बाबत सहकार विभागा कडे तक्रार दाखल केली होती.या तक्रारीची दखल घेत सहकार विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांनी वेळोवेळी पत्रव्यवहार करून चौकशीचे आदेश दिले.महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ मधील कलम १६ अन्वये या प्रकरणाची कायदेशीर प्रक्रिया सुरू करण्यात आली.चौकशी दरम्यान तक्रारीची पडताळणी, उपलब्ध कागदपत्रे व अभिलेखांची तपासणी,पंचनामा तसेच चौकशी अहवाल तयार करण्याची कार्यवाही करण्यात आली.संबंधित व्यक्ती कडे वैध सावकारी परवाना नसताना सावकारी व्यवसाय सुरू होता का?तसेच व्याजाच्या नावाखाली बेकायदेशीर वसुली किंवा अन्य आर्थिक व्यवहार करण्यात आले का?याबाबत सहकार विभागाकडून तपासणी करण्यात आली.या प्रकरणात ४ ऑक्टोबर २०२४ रोजी पोलीस कर्मचारी आणि संबंधित अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत घरझडतीची कार्यवाही करण्यात आल्याचा उल्लेखही उपलब्ध कागदपत्रांमध्ये आहे. त्यानंतर तालुका निबंधक,सहायक निबंधक आणि जिल्हा उपनिबंधक कार्यालयां दरम्यान अनेकदा पत्र व्यवहार करून प्रकरणाचा पाठपुरावा करण्यात आला.२०२६ मध्येही या प्रकरणाची कार्यवाही सुरूच होती.अखेर दि.२९ऑक्टोबर २०२६ रोजी सहायक निबंधक,सहकारी संस्था,परळी यांनी पत्र क्रमांक १५३०/२०२६ अन्वये परळी ग्रामीण पोलीस ठाण्यात तातडीने गुन्हा दाखल करण्याबाबत कार्यवाही केली. त्यानुसार संबंधित व्यक्तीविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.सतीश तोटावर जिल्हा उप निबंधक सहकारी संस्था बीड आणि शिवराज नेहरकर सहाय्यक निबंधक परळी यांच्या मार्गदर्शनाखाली परळी तील या प्रकरणामुळे जिल्ह्यातील बेकायदेशीर सावकारकी करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

बेकायदेशीर सावकारी विरोधात कारवाईची अपेक्षा

सावकारीचा परवाना नसताना गरजू नागरिकांना पैसे देऊन त्यांच्याकडून अवाजवी व्याजाची वसुली करणे आर्थिक अडचणीचा गैरफायदा घेणे आणि कर्जदारांची आर्थिक पिळवणूक करणे अशा प्रकारांमुळे सर्वसामान्य नागरिक त्रस्त होतात.त्यामुळे अशा प्रकरणांमध्ये सहकार विभाग आणि पोलीस प्रशासनाने समन्वयाने कठोर कारवाई करावी अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

जायकवाडीचे पाणी शेवटच्या टोकापर्यंत सोडा-आ.डॉ.गुट्टे

शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी जलसंपदामंत्र्यांचे वेधले लक्ष : कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत पाणीप्रश्नावर ठाम भूमिका

दैनिक वादळ वार्ता
गंगाखेड । गोपाळकृष्ण पाळवदे

मराठवाड्यासह गंगाखेड विधानसभा मतदारसंघात कोरड्या दुष्काळामुळे शेतकरी बांधवांची अवस्था अत्यंत बिकट झाली असून, शेती आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेसमोर गंभीर आव्हाने उभी राहिली आहेत. या पार्श्वभूमीवर जायकवाडी प्रकल्पाचे पाणी गंगाखेड विधानसभा मतदारसंघातील भूजल क्षेत्रात कालव्याच्या शेवटच्या टोकापर्यंत (टेलपर्यंत) सोडण्यात यावे, तसेच गंगाखेड शहराजवळील मन्नाथ मंदिराच्या पाठीमागे असलेल्या तळ्यातही पाणी सोडून शेतकरी आणि स्थानिक नागरिकांना दिलासा द्यावा, अशी आग्रही मागणी स्थानिक आमदार डॉ. रत्नाकर गुट्टे यांनी राज्याचे जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे केली. छत्रपती संभाजीनगर येथील विभागीय आयुक्त कार्यालयात जायकवाडी प्रकल्पाच्या पाणीवापरासंदर्भात आयोजित कालवा सल्लागार समितीच्या महत्त्वपूर्ण बैठकीत आ.डॉ.गुट्टे यांनी गंगाखेड विधानसभा मतदारसंघातील पाणीप्रश्न आणि शेतकऱ्यांच्या गंभीर समस्यांकडे मंत्री महोदयांचे लक्ष वेधले.

सन २०२६-२७ या आगामी सिंचन हंगामाच्या पार्श्वभूमीवर आयोजित या बैठकीत जायकवाडी प्रकल्पातील उपलब्ध पाणीसाठ्याचे नियोजन, सिंचनासाठी पाण्याचे वितरण, कालव्यांची सद्यस्थिती आणि उपलब्ध जलसंपत्तीचा कार्यक्षम वापर यांसह विविध महत्त्वपूर्ण विषयांवर सविस्तर विचारविनिमय करण्यात आला. यावेळी आ.डॉ.गुट्टे यांनी सिंचन नियोजनासह प्रत्यक्ष शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या अडचणी आणि विधानसभा मतदारसंघातील स्थानिक पाणीटंचाईचे प्रश्न ठामपणे मांडले. जायकवाडी प्रकल्पाचा लाभ प्रत्यक्ष गरजू शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी पाण्याचे नियोजन करताना मतदारसंघातील भौगोलिक परिस्थिती, शेतीच्या गरजा आणि पाण्याच्या उपलब्धतेचा विचार करणे आवश्यक असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले.

मराठवाड्यातील शेती मोठ्या प्रमाणावर पावसाच्या अनिश्चिततेवर अवलंबून आहे. पावसाने ओढ दिली

किंवा पावसाचे वितरण असमान झाले, की त्याचा थेट परिणाम पिकांच्या वाढीवर, उत्पादनावर आणि शेतकऱ्यांच्या आर्थिक परिस्थितीवर होतो. सध्याच्या कोरड्या दुष्काळसदृश परिस्थितीत शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाण्याची उपलब्धता हा जीवनमरणाचा प्रश्न बनत आहे. अशा परिस्थितीत जायकवाडी प्रकल्पातील पाण्याचे नियोजन करताना केवळ उपलब्ध साठ्याची आकडेवारी महत्त्वाची नसून, त्या पाण्याचा प्रत्यक्ष लाभ कोणत्या भागाला आणि किती प्रमाणात मिळतो, हेही तितकेच महत्त्वाचे आहे. त्यामुळे गंगाखेड मतदारसंघातील शेवटच्या टोकावरील शेतकऱ्यांनाही सिंचनाच्या पाण्याचा लाभ मिळावा, या दृष्टीने आ.डॉ.गुट्टे यांनी टेलपर्यंत पाणी सोडण्याची मागणी केली.तसेच शहराजवळील मन्नाथ मंदिराच्या पाठीमागे असलेल्या तळ्यात जायकवाडी प्रकल्पाचे पाणी सोडण्यात यावे, अशी स्वतंत्र मागणीही आ.डॉ.गुट्टे यांनी केली. या तळ्यात पाणी उपलब्ध झाल्यास स्थानिक परिस्थितीनुसार परिसरातील शेतकऱ्यांना आणि नागरिकांना दिलासा मिळण्यास मदत होऊ शकते. तसेच पाण्याचे नियोजन करताना मोठ्या सिंचन क्षेत्रासोबतच स्थानिक पातळीवरील गरजा आणि पाणी उपलब्ध करून देण्याच्या व्यवहार्य पर्यायांचाही विचार व्हावा, अशीही भूमिका त्यांनी मांडली. दरम्यान या बैठकीत जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी उपस्थितांची मते जाणून घेतली आणि संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे निर्देश दिले. आगामी सिंचन हंगामात उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजन करून शेतीसाठी पाणी उपलब्ध करून देणे, सिंचन व्यवस्थापन अधिक प्रभावी करणे आणि जलसंपत्तीचा नियोजनबद्ध विनियोग करणे, या बाबींवर बैठकीत भर देण्यात आला. त्यामुळे गंगाखेड मतदारसंघासाठी केलेल्या मागण्यांच्या अनुषंगाने प्रत्यक्ष पाणीवाटपाचे नियोजन आणि त्याची अंमलबजावणी महत्त्वाची ठरणार आहे.

देगलूर युवासेना तालुकाप्रमुखपदी भागवत पाटील सोमुरकर यांची नियुक्ती

पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरेंसह वरिष्ठ नेत्यांचे मानले आभार

दैनिक वादळ वार्ता
देगलूर । मारोती कुडकेवार

शिवसेनाप्रमुखांच्या ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण या पवित्र सूत्राला स्मरून, मला मिळालेल्या या पदाचा उपयोग मी देगलूर तालुक्यातील तरुणांच्या आणि सर्वसामान्यांच्या हितासाठी, सामाजिक कार्यासाठी पुरेपूर करेन. तालुक्यात संघटना तळागाळापर्यंत मजबूत करून शिवसेना आणि युवासेना वाढीसाठी माझे १०० टक्के योगदान देईन..
-श्री. भागवत पाटील सोमुरकर नवनियुक्त युवासेना तालुकाप्रमुख, देगलूर

वंदनीय शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आशीर्वादाने आणि शिवसेना पक्षप्रमुख, महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री कुटुंबप्रमुख माननीय उद्धवजी बाळासाहेब ठाकरे साहेब यांच्या खंबीर नेतृत्वाखाली, युवासेनाप्रमुख माजी मंत्री माननीय आदित्यजी ठाकरे साहेब व युवासेना सचिव आमदार माननीय वरुणजी सरदेसाई भैया यांनी आज श्री. भागवत पाटील सोमुरकर यांची देगलूर युवासेना तालुकाप्रमुख म्हणून अधिकृत नियुक्ती जाहीर केली आहे. या अत्यंत महत्त्वाच्या जबाबदारीबद्दल सोमुरकर यांनी पक्षनेतृत्वाचे जाहीर आभार व्यक्त केले आहेत. श्री भागवत पाटील सोमुरकर यांच्या या निवडीमागे शिवसेना जिल्हाप्रमुख भुजंग पाटील साहेब, युवासेना विभागीय सचिव महेशजी खेडकर, युवासेना सहसचिव अक्षयजी वट्टमवार तसेच शिवसेना उपजिल्हाप्रमुख महेशजी पाटील यांचे मोलाचे सहकार्य आणि बहुमूल्य मार्गदर्शन लाभले. ही निवड म्हणजे सोमुरकर यांच्या आजवरच्या सामाजिक आणि राजकीय जीवनातील प्रामाणिक कार्याची मिळालेली हक्काची पावतीच मानली जात आहे.

श्री भागवत पाटील सोमुरकर यांच्या निवडीचे वृत्त समजताच संपूर्ण देगलूर तालुक्यात शिवसैनिक आणि युवा सैनिकांमध्ये प्रचंड उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. तालुक्यातील सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील अनेक मान्यवरांकडून त्यांच्यावर शुभेच्छा आणि अभिनंदनाचा जोरदार वर्षाव होत आहे.

राष्ट्रसंत भगवान बाबा मंदिराच्या रंगरंगोटी कामाचा प्रारंभ; शिवसेना जिल्हाप्रमुख रत्नाकर आप्पा शिंदे यांनी पाळला दिलेला शब्द!

दैनिक वादळ वार्ता
केज । प्रकाश मुंडे



शिक्षक कॉलनी, केज येथील राष्ट्रसंत भगवान बाबा मंदिरात सध्या अखंड हरिनाम सप्ताह मोठ्या उत्साहात पार पडत आहे. या सप्ताहाच्या निमित्ताने भाविकांना दिलेला शब्द पाळत, बीड जिल्हा शिवसेना जिल्हाप्रमुख रत्नाकर आप्पा शिंदे यांच्या वतीने मंदिराच्या रंगरंगोटीच्या (कलरच्या) कामाला आज, मंगळवार दि. ३ नोव्हेंबर रोजी प्रत्यक्ष सुरुवात करण्यात आली आहे.

शिक्षक कॉलनी परिसरातील राष्ट्रसंत भगवान बाबा मंदिरामध्ये ३१ ऑक्टोबरपासून अखंड हरिनाम सप्ताहाचा प्रारंभ झाला आहे. या सोहळ्यादरम्यान शिवसेना जिल्हाप्रमुख रत्नाकर आप्पा शिंदे यांनी ह.भ.प. अर्जुन महाराज लाड, श्रीराम विडेकर गुरुजी, केशव शास्त्री महाराज, गटनेते हारूनभाई इनामदार, बाबासाहेब केदार सर, प्रकाश मुंडे, स्वातीताई भोसले आणि उपस्थित सर्व भाविक-भक्तांच्या समक्ष मंदिराच्या आकर्षक कलर, रंगरंगोटीचा संकल्प जाहीर केला होता.

आपला हा संकल्प आणि दिलेला शब्द तंतोतंत पाळत आज दि.०३ नोव्हेंबर मंगळवारी प्रत्यक्ष कामास सुरुवात करण्यात आली आहे. अखंड हरिनाम सप्ताहाच्या काळातच मंदिराला हे आकर्षक रूप प्राप्त होणार असल्याने, शिक्षक कॉलनी परिसरातील नागरिक व सप्ताहातील सर्व भाविक-भक्तांकडून रत्नाकर आप्पा शिंदे यांचे मनःपूर्वक आभार मानले जात असून त्यांच्या या कार्याचे कौतुक होत आहे.

पाण्याअभावी ऊस वाळत असल्याने कारखान्याने तात्काळ ऊस घेऊन जावा

रांजणीचे सरपंच अमोलभाऊ देशमुख यांची मागणी

दैनिक वादळ वार्ता
जालना । असलम कुरेशी

मराठवाड्यात यंदा पावसाचे प्रमाण अत्यल्प झाल्याने भीषण पाणीटंचाई निर्माण झाली आहे. परिणामी पाण्याअभावी शेतातील ऊस पिक सुकू लागले असून शेतकरी हवालदिल झाला आहे. पाण्याअभावी ऊसाची वाढ खुंटली असून पाने पिवळी पडत आहेत, त्यामुळे कारखाना प्रशासनाने तात्काळ ऊस तोडणी करून ऊस घेऊन जावा, अशी मागणी रांजणीचे सरपंच अमोलभाऊ देशमुख यांनी माजी मंत्री राजेशभैय्या टोपे यांच्याकडे केली असून श्री टोपे यांनी सकारात्मक आश्वासन दिले.

यासंदर्भात अमोलभाऊ देशमुख यांनी सांगितले की रांजणी सर्कलमधील अनेक शेतकऱ्यांनी ऊस लागवड केली आहे. मागील वर्षी चांगला पाऊस झाल्याने ऊस जोमात होता, मात्र यंदा विहिरी, बोअरवेल कोरड्या पडल्याने पाण्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. पाणी नसल्याने ऊस वाळू लागला आहे. जर वेळेत ऊस कारखान्यात गेला नाही तर शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होणार आहे. नोंद केलेला ऊस मोठ्या प्रमाणात शेतातच उभा आहे. ऊस सुकल्याने वजनात घट होत असून साखर उताराही कमी होण्याची भीती आहे. त्यामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसणार आहे.

या पार्श्वभूमीवर कारखाना प्रशासनाने तात्काळ लक्ष घालून ऊसतोड टोळी व हार्वेस्टर पाठवून पाण्याअभावी सुकत असलेला ऊस प्राधान्याने घेऊन जावा, अशी मागणी सरपंच अमोलभाऊ देशमुख यांनी केली आहे. या विषयावर माजी मंत्री राजेशभैय्या टोपे यांनी सकारात्मक विचार करून तात्काळ ऊस घेऊन जाण्याचे आश्वासन दिले.

जयभवानी चौकात पुन्हा टिपरची कारला धडक! कारचालक थोडक्यात बचावला; मोठा अनर्थ टळला,चौक ब्लॅक स्पॉट घोषित करण्याची मागणी

दैनिक वादळ वार्ता
केज । प्रतिनिधी

केज शहरातील धारूर रोडवरील जयभवानी चौकात अपघातांचे सत्र थांबण्याचे नाव घेत नसून,मंगळवारी सकाळी पुन्हा टिपर आणि कारचा अपघात झाला.रस्ता क्रॉस करण्यासाठी प्रतीक्षेत उभ्या असलेल्या कारला पाठीमागून भरधाव आलेल्या टिपरने जोरदार धडक दिली.या अपघातात कारचे किरकोळ नुकसान झाले असून, सुदैवाने कारचालक थोडक्यात बचावला. कोणतीही जीवितहानी झाली नसल्याने मोठा अनर्थ टळला.या अपघातातील कारचा क्रमांक एम एच २३ बीएच ३१२६ असल्याची माहिती आहे.भवानी चौकात वारंवार अपघात घडत असल्याने हा चौक वाहन धारकांसाठी धोकादायक बनला आहे.यापूर्वीही या ठिकाणी अनेक अपघात झाले असून, काहींना आपला जीव गमवावा लागला आहे. त्यामुळे भवानी चौक म्हणजे मृत्यूचा सापळा अशी भावना नागरिकां मधून व्यक्त होत आहे.

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन साहेब, आणखी किती बळींची प्रतीक्षा?

धारूर रोडवरील जय भवानी चौकातील वाढते अपघात लक्षात घेता जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी या गंभीर समस्येकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी होत आहे.या चौकाची प्रत्यक्ष पाहणी करून संबंधित विभागामार्फत तांत्रिक तपासणी करावी आणि आवश्यक निकषांनुसार या ठिकाणाला अधिकृत पणे 'ब्लॅक स्पॉट' घोषित करण्यासाठी कार्यवाही करावी,अशी मागणी नागरिकांतून होत आहे.या चौकात गतिरोधक,वाहतूक सिग्नल, दिशादर्शक फलक,रस्त्यावर पांढरे पट्टे,पुरेशी प्रकाश व्यवस्था आणि अवजड वाहनांच्या वेगावर नियंत्रण ठेवण्यासाठी कायम स्वरूपी उपाययोजना करणे गरजेचे आहे. आजच्या अपघातात कारचालक थोडक्यात बचावला; मात्र प्रत्येक वेळी असे नशीब साथ देईलच असे नाही. त्यामुळे आणखी एखादी मोठी दुर्घटना घडण्यापूर्वी प्रशासनाने जागे होऊन जयभवानी चौकातील अपघात रोखण्यासाठी ठोस पावले उचलावीत,अशी मागणी जोर धरत आहे.

सोनाई फाउंडेशनच्या वतीने नवी मुंबईत भव्य पुरस्कार सोहळा; 'यशवंत नीती' दिवाळी अंकाचेही दिमाखदार प्रकाशन

दैनिक वादळ वार्ता
मुंबई । प्रतिनिधी

समाजहितासाठी निःस्वार्थ भावनेने केलेल्या उल्लेखनीय कार्याची राज्यस्तरावर दखल घेत 'स्माईल फाउंडेशन'ला प्रतिष्ठेचा 'वारणा भूषण राज्यस्तरीय पुरस्कार २०२६' प्रदान करून गौरविण्यात आले. सोनाई फाउंडेशनच्या वतीने नवी मुंबई स्पोर्ट्स असोसिएशन येथे आयोजित भव्य पुरस्कार सोहळ्यात संस्थेच्या प्रतिनिधींना मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

महाराष्ट्राच्या विविध भागांतून सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांचे प्रतिनिधी या सोहळ्यास उपस्थित होते. समाजातील गरजू घटकांसाठी सातत्याने कार्य करणाऱ्या संस्था व कार्यकर्त्यांच्या योगदानाचा गौरव या माध्यमातून करण्यात आला.

स्माईल फाउंडेशनच्या माध्यमातून राबविण्यात येणारे विविध सामाजिक उपक्रम, समाजाप्रती असलेली बांधिलकी आणि जनसेवेच्या कार्याची दखल घेऊन संस्थेला या पुरस्कारासाठी निवडण्यात

आले. या सन्मानामुळे संस्थेच्या सामाजिक कार्याला राज्यस्तरावर विशेष ओळख मिळाली असून कार्यकर्त्यांचा उत्साहही वाढला आहे.

या पुरस्कारासाठी स्माईल फाउंडेशनचे नामांकन संजय सावंत सर यांनी केले होते. त्यांच्या या सहकार्याबद्दल संस्थेच्या प्रतिनिधींनी संजय सावंत सर तसेच पुरस्कार सोहळ्याचे आयोजक सोनाई फाउंडेशनचे विशेष आभार व्यक्त केले.

दरम्यान, या कार्यक्रमाचे आणखी एक आकर्षण म्हणजे 'यशवंत नीती' या दिवाळी अंकाचे मान्यवरांच्या उपस्थितीत दिमाखदार प्रकाशन. पुरस्कार वितरणासोबतच साहित्यिक उपक्रमालाही या सोहळ्यात विशेष महत्त्व प्राप्त झाले.समाजासाठी निःस्वार्थ भावनेने काम करणाऱ्या संस्थांना अशा पुरस्कारांमुळे नवी प्रेरणा आणि प्रोत्साहन मिळते. 'वारणा भूषण राज्यस्तरीय पुरस्कार २०२६' हा स्माईल फाउंडेशनच्या सामाजिक वाटचालीतील महत्त्वाचा सन्मान ठरला असून, भविष्यात अधिक व्यापक स्वरूपात समाजसेवा करण्यासाठी हा गौरव प्रेरणादायी ठरणार आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077